# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

कुष्ठरुग्ण, सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम १३ सप्टेंबर २०२२ ते १६ सप्टेंबर आणि २६सप्टेंबर २०२२ ते ७ ऑक्टोबर २०२२ :-

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत कुष्ठरुग्ण, सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम १३ सप्टेंबर २०२२ ते १६ सप्टेंबर आणि २६सप्टेंबर २०२२ ते ७ ऑक्टोबर २०२२ राबविण्यात येत आहे. या मोहिमेचे मुख्य उदिदृष्ट हे आहे की,

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण कमीत कमी कालावधीत शोधून त्यांना उपचाराखाली आणणे व समाजात जनजागृती करणे या उद्‌देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार १३ सप्टेंबर २०२२ ते १६ सप्टेंबर आणि २६सप्टेंबर २०२२ ते ७ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत संयुक्त सक्रिय क्षयरुग्ण व कुष्ठरुग्ण शोध अभियान राबविण्यात येणार आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत महापालिका आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहिम राबविण्यात येणार आहे. या करिता ८२ पथकांची स्थापना करण्यात आली आहे. ही पथके १,७२,७७४ घरांतील भेटी देउन त्यांची तपासणी करणार आहेत. तसेच कुष्ठरोग व क्षयरोगाबाबत माहिती प्रसारण आणि जन्‌-जागृती करणार आहेत. दररोज २५ घरांना भेट देउन माहिती संकलन करण्याचे उदिदृष्ट प्रत्येक पथकाला दिले आहे. या पथकाला एक महिला व एक पुरुष कर्मचारी असून घरातील महिलांची तपासणी महिला कर्मचा-यांमार्फत करण्यात येणार आहे. तपासणी मध्ये कुष्ठरोगाकरिता त्वचेवर फिकट लालसर बधिर चट्टा त्या ठिकाणी घाम न येणे, जाड बधिर तेलकट चकाकणारी त्वचा, त्वचेवर गाठी असणे, कानाच्यापाळया जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पुर्ण बंद न करता येणे अशा प्रकारची लक्षणे आहेत का हे तपासले जाणार आहे. त्याच प्रमाणे क्षयरोगासाठी दोन आठवडयांपेक्षा जास्त खोकला, दोन आठवडयांपेक्षा जास्त ताप, वजनात लक्षणीय घट, थुंकी वाटे रक्त येणे मानेवरील गाठ अशा लक्षणांची विचारणा व तपासणी करण्यात येणार आहे.

कुष्ठरोग व क्षयरोग रुग्णांचा शोध घेउन त्यावर औषधोपचार करीत संसर्गाची साखळी खंडीत करण्याचा प्रयत्न करुन या दोन्ही रोगांच्या निर्मूलनाचे उदिदृष्ट पालिकेने ठेवले आहे. नागरीकांनी या मोहिमांस प्रतिसाद देउन लक्षणे जाणवल्यास स्वतःची कुष्ठरोग तपासणी करुन घ्यावी. तसेच क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास थुंकी नमुने देउन अभियानांचे उदिदृष्ट साध्य करण्यात संपूर्ण सहकार्य करावे.

वैद्यकीय आरोग्य विभाग
उल्हासनगर महानगरपालिका